# जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी
## प्रसिद्धी माध्यम कक्ष

**जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत,वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०० ०५१.**
**दूरध्वनी क्र. कार्यालय :- ०२२-२६४०११५६,E-mail ID :-**
mumbaisuburbanmediacell@gmail.com

--------------------------------------------------------------------------------

**प्रेस नोट**

### मुंबई उपनगर जिल्ह्यात पहिल्या दिवशी
### एका उमेदवाराचा अर्ज दाखल

मुंबई, दि. २ एप्रिल २०१९ :- मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक १०/०३/२०१९ रोजी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०१९ ची घोषणा केली असून आज दिनांक २ एप्रिल , २०१९ रोजी निवडणुकीची सूचना जारी झाली आहे. मुंबई उपनगर जिल्ह्यात नामनिर्देशन पत्रे सादर करण्याच्या आजच्या पहिल्या दिवशी २६ - मुंबई उत्तर लोकसभा मतदार संघात एका उमेदवाराने अर्ज दाखल केला.

२६ - मुंबई उत्तर लोकसभा मतदार संघातुन भारतीय जनता पार्टीतर्फे श्री. गोपाळ चिनय्या शेट्टी यांनी आपले नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर केले. २७ - मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदार संघ, २८ - मुंबई उत्तर पूर्व लोकसभा मतदार संघ, २९ - मुंबई उत्तर-मध्य लोकसभा मतदार संघातून अद्याप एकाही उमेदवाराने नामनिर्देशन पत्र सादर केले नाही.

(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा.